Unit 4

# भारतातील जातीयता आणि फाळणी

## प्रस्तावना :-

भारतातील मुघल सत्ता ब्रिटिशांनी नष्ट केल्यामुळे भारतात जवळजवळ सहाशे वर्ष राज्य करीत असलेल्या मुस्लीम समाजास अगदी स्वभाविकपणे ब्रिटीश राज्यकर्त्यांविषयी नाराजी होती. सन 1793 मध्ये लॉर्ड कॉर्नवालिस बंगालमधील मुस्लीमांच्या इनामी जमीनी जप्त केल्या परिणामी जमीन महसुलाच्या वसुलीचे काम करणाऱ्या हिंदुच्या सधन वर्ग या काळात उदयास आला याचबरोबर कंपनीच्या राजवटीत ब्रिटिशांना मुस्लीम समाजाविषयी विश्वास वाटत नसल्यामुळे मुस्लीमांना नोकरी व मनाच्या जागा मिळवण्याचे प्रमाण फारच कमी होते सैन्यामध्ये यांना विशेष वाव दिला जात नसे त्यामुळे मुस्लीम आणि ब्रिटिशांमध्ये सलोख्याचे संबंध कधीच निर्माण होउ शकले नाही

## मुस्लीम जातीयवाद संकल्पना :-

हिंदु मुस्लीम या प्रमुख जातीनत फाटाफुट निर्माण करणे विशेषत: मुस्लीम जमातीला राष्ट्रीयप्रवाहापासुन दुर ठेवणे हे सामान्यत: सन 1900 पासुन ब्रिटीश राज्यकर्त्यांचे मुख्य धोरण राहिले याच धोरणातुन गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झनने सन 1905 मध्ये बंगालची फाळणी केली बंगालची फाळणी केवळ बंगाल प्रांताची फाळणी नव्हती तर हिंदु व मुस्लीम या दोन समाजांची फाळणी ~~केवळ बंगाल प्रांताची~~ होती या फाळणीमध्ये केवळ प्रशासकीय सोय हा एकमेव हेतु नसुन या नव्या प्रांतात इस्लाम धर्माचे प्राबल्य स्थापन करुन इस्लामच्या सच्च्या अनुयायांना राजकीय व आर्थिक क्षेत्रात प्राधान्य देणे आपला खरा हेतु आहे पुर्व बंगालच्या नव्या प्रांतात मुस्लीम बहुसंख्य आल्यामुळे मिळणाऱ्या फायद्यांचा तुम्ही धिक्कार करणार आहात काय? असा सवाल लॉर्ड कर्झने मुस्लीम समाजासमोर केला शिवाय नव्या पूर्व बंगाल प्रांतात लेफ्टनंटन गव्हर्नरच्या प्रांतात ~~[illegible]~~ दर्जा दिला जाणार असल्यामुळे तेथे विधानसभा राहिल असे कर्झनने जाहिर केले कर्झनच्या या डावपेचांना यश येउन सुरवातीस फाळणीला असणारा मुस्लीमांचा विरोध संपला त्यातच ढाक्का

Scanned by CamScanner

चा कर्जबाजारी असणारा मुस्लीमांचा विरोध संपला त्यातच ढाक्क्याचा कर्जबाजारी नवाब सर सलीमुल्लाला चौदा लाख रुपयांचे कर्ज देऊन लॉर्ड कर्झनने त्याला सरकारी पक्षात वळवुन घेतले. परिणामी पुर्व बंगालमध्ये मुस्लीमांचे बहुमत राहिल असे सांगुन नवाबाने वंगभंगाचा पुरस्कार करण्यास सुरवात केली अशा प्रकारे ब्रिटिशांनी संपुर्ण मुस्लीम समाज वंगभंग चळवळीपासुन बाजुला केले आणि हिंदीपासुन आपण भिन्न आहोत ही भावना मुस्लीमांमध्ये रुजवली

सर आगाखानाच्या शिष्टमंडळाला उत्तर देताना लॉर्ड मिंटो म्हणाले तुम्ही देशातील एकेकाळचे शासक होता आणि तुम्हाला ब्रिटीश राजवटीमुळे होणाऱ्या फायद्याची पुर्ण जाणीव आहे तुमच्या निवेदनाचा आशय माझ्या लक्षात आला मी समजतो त्याचप्रमाणे मुस्लीम समाजास वेगळा समाज म्हणुन स्वतंत्र मतदारसंघ असावा त्याशिवाय मुस्लीम समाजाच्या हितसंबधाचे संरक्षण करणारे खरे प्रतिनिधिक संस्थामध्ये निवडून यावयाचे नाहीत तुमच्या मागण्यांशी मी पुर्णपणे सहमत आहे.

ब्रिटिश सरकारने हे महत्वाकांक्षी धोरण राबवुन मुस्लीमांना हिंदुपासून पूर्णपणे वेगळे होण्यास भाग पडले ब्रिटिश साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय योग्य होता परंतु भारतीय इतिहासातील तो अत्यंत घातक/दुर्दैवी क्षण ठरला यानंतर जातीयवाद उफाळून आला मुस्लीमांच्या विशेष हक्कांसाठी ब्रिटिश राजकारणीत आग्रही होते ही गोष्ट या घटनेवरुन स्पष्ट दिसुन येते.

Page No.:
Date: / /

## • मुस्लीमांचा स्वतंत्र मतदारसंघ :-

लॉर्ड मिंटो याने मुस्लीमांच्या शिष्टमंडळाला सिमला येथे दिलेल्या आश्वासानुसार सन 1909 च्या मोर्ले - मिंटो सुधारणा कायद्याने स्वातंत्र्य मतदारसंघ दिले. त्यामुळे भारतामध्ये हिंदु मुस्लीम एकी कायमची भंग पावली. भारतीय समाजाचे दोन तुकडे करण्याचा ब्रिटीशांना प्रयत्न यशस्वी होऊ लागला.

## • लखनौ करार :-

हिंदु - मुस्लीम दुरावा निर्माण करणाऱ्या बंगालच्या फाळणीला देशभरातील हिंदुनी प्रचंड विरोध केला. त्यामुळे इंग्रज हे आपले हितकर्ते तर हिंदु हे आपले हितशत्रु असे मुस्लीमांना वाटू लागले. बंगालच्या फाळणीनंतरच्या काळात क्रांतिकारी चळवळीचा जोर वाढला. सन 1909 मध्ये व्हाईसराय लॉर्ड मेंटो यांच्या हत्येचा प्रयत्न झाला. जनक्षोभ दिवसेंदिवस वाढिस लागला. वंगभंग आंदोलनाने ब्रिटीशांच्या विरोधात वंगभंग आंदोलनाने ब्रिटीशांच्या विरोधात अव्हान उभे केले. या सर्व धक्कांमुळे ब्रिटीश सरकारला भारतीय जनतेमधील रोष कमी करण्याची आवश्यकता वाटू लागली म्हणुन इ. स 1911 मध्ये इंग्लंडचा राजा पंचम जॉर्जने बंगालची फाळणी रद्द केल्याचे जाहिर केले.

मुस्लीमांच्या फायद्यासाठी केलेली बंगालची फाळणी रद्द करण्यात आल्याचे घोषित केल्यामुळे मुस्लीम लीगची घोर निराशा झाली. आपल्या स्वार्थासाठी ब्रिटिश सरकार मुस्लीमांचाही बळी देऊ शकते ही गोष्ट लक्षात असल्यामुळे मुस्लीम लीगच्या नेत्यांची ब्रिटिशांवरील निष्ठा डळमळू लागली याच दरम्यान सन 1912 मध्ये युरोपात बाल्कन राष्ट्रांवरील तुर्कस्तानचे इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारले. तुर्कस्तानचा सुलतान हा जगातील सर्व मुस्लीमांचा धर्मगुरु म्हणजे खलिफा समजल्यात येत होता. पहिल्या महायुद्धात जर तुर्कस्तानचा पराभव झाला तर इंग्रज खलिफाला ठार मारतील व त्यांची

Scanned by CamScanner

सत्ता नष्ट करतील याची भिती भारतीय मुस्लीमांना वाटत होती या सर्व कारणांमुळे भारतीय मुस्लीम नेते ब्रिटीशांना विरोध करण्याची भाषा बोलु लागले मुस्लीम लीगच्या धोरणात झालेला हा बदल लक्षात घेऊन काँग्रसने मुस्लीम लीगशी जवळीक साधली त्यातुनच लखनौ करार जन्मास आला.

सन 1916 मध्ये लखनौ येथे काँग्रेस व मुस्लीम लीग यांचे अधिवेशन एकाच वेळी शेजारी सुरु झाले यावेळी दोघांमध्ये एक करार घडून आला त्यास लखनौ करार म्हणतात.

- खिलाफत चळवळ :-

पहिल्या महायुद्धात जर्मनीची बाजु घेऊन तुर्कस्तानने इंग्लडविरुद्ध युद्ध पुकारले भारतीय सैनिक इंग्लडच्या बाजूने पहिल्या महायुद्धात लढत होते सहाजिकच भारतीय सैन्यातील मुस्लीमांचा या युद्धात तुर्की मुस्लीम समाजामध्ये ब्रिटीशां विषयी कटूता निर्माण घेऊ म्हणुन ब्रिटीश पंतप्रधान लॉर्ड जॉर्जने तुर्कस्तानातील खलिफाची सत्ता नष्ट करणार नाही असे वचन दिले पहिल्या महायुद्धात इंग्लड आणि दोस्त राष्ट्रांचा विजय झाला. तर जर्मनी आणि तुर्कस्तान पहिल्या महायुद्धात यांचा पराभव झाला इंग्लडच्या प्रधान-पंतप्रधानमंत्री दिल्याने वचनाप्रमाणे तुर्कस्तानाच्या सुलतानची म्हणजेच मुस्लीम जगताचा धर्मगुरु असलेल्या खलिफाची सत्ता आबाधित राखणे आवश्यक होते परंतु तुर्कीचे साम्राज्य नष्ट करण्यात आले इंग्लडने भारतीय मुस्लीमांना दिलेले आश्वासन पाळले नाही त्यामुळे तुर्कस्तानचा सुलतान म्हणजेच आखिल मुस्लीम जगाचा धर्मगुरु मानला जात असल्याने भारतीय मुस्लीम ब्रिटीशांवर संतापले ब्रिटीशांच्या या विश्वास घातामुळे मुस्लीमांच्या ब्रिटीशनिष्ठेला तडा गेला ब्रिटीशांनी वचनभंग केला म्हणुन भारतातील हिंदुही मुस्लीमांच्या असंतोष सामील झाले भारतातील मुस्लीमांनी ब्रिटीशांचा

निषेध करण्यासाठी व खलिफाला पाठिंबा दिला व १७ ऑक्टोबर १९१९ रोजी संपूर्ण भारतात खिलाफतीसाठी म्हणुन हरताळ पाळण्यात आला. २४ नोव्हेंबर १९१९ रोजी दिल्ली येथे अखिल भारतीय खिलाफत परिषद भरली. या परिषदेचे अध्यक्ष पद गांधीजीं ना देण्यात आले. या परिषदेत ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावा असा ठराव मंजुर करण्यात आला. खलिफाच्या सत्तेच्या पुर्नस्थापनेसाठी ब्रिटिशांशी असहकार पुकारण्याचा निर्णय मुस्लीम नेत्यांनी घेतला. यानंतर मुंबई येथे भारतीयच मुस्लीमांच्या केंद्रीय खिलाफत समितीने 28 मे 1920 रोजी ब्रिटिश सरकारविरुद्ध अहिंसक असहकार पुकारण्याचा निर्णय घोषित केला. हिंदु मुस्लीम ऐक्याची चालुन आलेली सुवर्णसंधी साधण्याचा निर्णय घेउन महात्मा गांधींनी असहकारितेची चळवळ सुरु केली. खिलाफत संघटनेने सुरु केलेल्या आंदोलनाबरोबर च काँग्रेसही गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकारितेचे आंदोलन सुरु केले. अशा रितीने खिलाफत चळवळीला पाठिंबा देउन काँग्रेसने मुस्लीमांना असहकार चळवळीत सामिल करुन घेतले.

सन १९२३ मध्ये इंग्लंड आणि दोस्त राष्ट्रांनी तुर्कस्तानबरोबर करार केला व आपल्या फौजा तुर्कस्तानमधून काढून घेतल्या. सन १९२४ मध्ये तुर्कस्तानामधील तरुण तुर्कांनी सुलतानविरुद्ध बंड करुन खलिफाची सत्ता नष्ट केली व प्रजासत्ताक राज्याची स्थापना केली. परिणामी भारतातील खिलाफत चळवळीची हवाच निघून गेली.

Page No:
Date. / /

• जातीय दंगल :-

खिलाफती आघात झाला म्हणुन अरबवंशीय मोपल्यांनी मलबारमध्ये सन १९२१ मध्ये ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र आंदोलन सुरु केले परंतु या बंडाला जातिय वळण मिळाले त्यामुळे मलबारमधील हिंदुवर या मोपाला मुस्लीमांनी अनन्वित अत्याचार केले हिंदुच्या सरसकट कत्तली केल्या धर्मवेड्या मुस्लीमांनी केलेल्या मलबारमधील दंगलीचे पडसाद संपूर्ण देशभर उमटले आणि सन १९२२ नंतर देशात ठिकठिकाणी हिंदु मुस्लीम दंगलीत घडून आल्या या दंगलीचे लोण मुलतान, अमृतसर दिल्ली, गुलबर्गा, नागपुर, अलाहाबाद, सहारनपूर इत्यादी ठिकाणी पसरले या दंगलीत तेढ वाढत गेली. हिंदु मुस्लीम ऐक्याची गांधीजीची आशा केवळ दिवास्वप्न ठरली.

थोडक्यात भारतात हिंदु व मुस्लीम समाज दिर्घकाळ एकत्र असले तरी दिर्घकालीन व स्थिर स्वरुपाची एकता कधीच निर्माण झाली नाही राजकीय धार्मिक कारणांमुळे न त्यांच्यात सदैव संघर्ष होत असल्याने दिसुन येतो त्यांच्या या कुटिर वृत्तीला खतपाणी घालुन आपली सत्ता दिर्घकाळ टिकवण्याचे धोरण इंग्रजांनी आखले या कार्यात इंग्रजांना यश मिळाले परिणामी हिंदु आणि मुस्लीम यांच्यातील तेढ वाढत गेली.

याचबरोबर वस्तुस्थिती अशी होती की संपूर्ण भारतावर आपली राजकीय सत्ता स्थापन करणाऱ्या मुस्लीम सत्तेला पराभुत करुन इंग्रजांनी आपली सत्ता स्थापन केली होती इस्लामी राज्यकर्त्यांकडून आपण सत्ता स्थापन केली होती असल्याने मुस्लीम समाज आपल्याविरुद्ध बंड करेल असा इंग्रजाचा समज असल्याने सुरवातीच्या काळात हिंदुना जवळ करा व मुस्लीमांना लांब ठेवा हे धोरण इंग्रजांनी ओळखले होते. याच धोरणातुन हिंदी राष्ट्रवादाचा जन्म झाला होता पुढे सन १९४० मध्ये मुस्लीम लीगच्या लोहार येथील अधिवेशनात बॅरिस्टर जीनांनी हिं राष्ट्रवादाचा सिद्धांत

मांडला आणि पाकिस्तानात या स्वातंत्र राष्ट्राची मागणी केली

## • जातिय निवाडा :-

सन 1930 मध्ये राष्ट्रीय काँग्रेसने सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली त्या चळवळीला बॅ. जीना यांनी पाठिंबा दिला सन 1930 मध्ये लंडन येथे पहिली गोलमेज परिषद झाली या परिषदेवर राष्ट्रीय काँग्रेसने बहिष्कार घेतला परंतु मुस्लीम लीगचे नेते बॅ जीना या परिषदेस उपस्थित राहिले आणि नेहरु अहवालामध्येच नाकारलेल्या चौदा मुद्द्यांचा आग्रह धरला. परंतु दुसऱ्या गोलमेज परिषदेतुनही काही निष्पन्न झाले नाही.

त्यानंतर भारतातील विभिन्न जाती जमातींना भिन्न धर्मियांना भिन्न हितसंबंधी गटांना प्रांतिक केंद्रीय कायदेमंडळामध्येच किती प्रमाणात व कशा प्रकारे प्रतिनिधीत्व देण्यात येणार आहे याबाबतची ब्रिटिश राज्यकर्त्यांची भुमिका स्पष्ट करणारा जातिय निवाडा 16 ऑगस्ट 1932 रोजी ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड. यांनी घोषित केले.

या जातीय निवाड्यानुसार मुस्लीम दलीत वर्ग ख्रिश्चन शिख या सर्वांना अल्पसंख्य गट म्हणुन मान्यता देण्यात आली त्यांना प्रमाणापेक्षा जादा प्रतिनिधीत्व देण्यात आले अल्पसंख्यांक गटांना संरक्षण व न्याय देण्याचे निमित्त करुन ब्रिटिशांनी भेदनीतीचा अवलंब केला या निवाड्यानुसार भारतीय समाज छोट्या छोट्या गटांमध्ये विभागला जाणार होता स्वतंत्र मतदारसंघामुळे मुस्लीम मतदार केवळ मुस्लीम मतांवरच अवलंबुन राहणार असल्याने हिंदुबरोबर सामंजस्याची गरज मुस्लीमांना राहिली नाही पाकिस्तानाच्या निर्मीतीसाठी मुस्लीम लीगच्याच उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन या जातीय निवाड्यामुळे बॅ जीना करु लागले परिणामी हिंदु मुस्लीम यांच्यातील दरी आधिकच रुंदावत गेली.

Scanned by CamScanner

Page No.:
Date: / /

## • पाकिस्तानची कल्पना :-

मुसलीमांच्या विभक्त मतदारसंघाच्या मागणीतुन हळुहळू पाकिस्तानच्या कल्पनेचा उदय झाला सारे जहाँ से अच्छा हिंदुस्ताँ हमारा हे राष्ट्रगीत लिहणारे उर्दू कवी महमंद व इक्बाल एकसंघ भारत विरोधक बनुन कट्टर जातीयवादी बनले धर्माच्या नावाखाली सर्व मुस्लीमांना स्वतंत्र राज्याच्या पुरस्कार महमंद इक्बाल यांनी केला आणि पाकिस्तानच्या कल्पनेचा पाया घातला.

सन 1933 मध्ये केंब्रीज विद्यापिठात शिक्षण देणाऱ्या चौधरी रहमतअली यांनी प्रसिद्ध केलेल्या Now or Never आताच अन्यथा पुढे कधीच नाही या पुस्तिकेत पाकिस्तान हा शब्द सर्वप्रथम वापरला या पुस्तिकेत त्याने P = Punjab A = Afganistan K - Kasimir I - Iron S - Sindh आणि Tan - Baluchistan असा तयार केला होता पाकिस्तानचा हा विचार हास्यास्पद आणि अन्यावेर्वाह असल्याने सन 1933 मध्ये गोलमेज परिषदेसाठी लंडनमध्ये गेलेल्या मुस्लीम लीगच्या प्रतिनिधींनी आणि बॅ जीना यांनी ती स्वेशाल फेटाळून लावली परंतु Divide and Rule या राजनीतीचा नेहमी वापर करणाऱ्या ब्रिटिशांनी मात्र पाकिस्तानच्या कल्पनेचे स्वागत केले आणि चौधरी रहिमत अलिच्या या योजनेला ब्रिटिश वृत्तपत्रांतुन खुप प्रसिद्धी दिली. बॅ जीनांनी पाकिस्तान या कल्पनेचा सुरुवातीला उपहास केलेला असला तरी सन 1940 च्या लाहोर अधिवेशनात पाकिस्तान हा शब्द त्यांनी मान्य केला.

Page No.:
Date: / /

- फाळणीची कारणे :-

हिंदी - मुस्लीम ऐक्य घडवून आणण्यासाठी खुप प्रयत्न केले गेले पण मुस्लीमांमध्ये कुटीर व जातीय वृत्ती वाढल्याने मुस्लीम लीगने चालुच ठेवले, याचबरोबरीने मुस्लीम लीगने इंग्रजांकडून स्वतंत्र्य पाकिस्तान मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले होते. मुस्लीम लीगने स्वतंत्र राष्ट्राची मागणी करण्यास खालील कारणे कारणीभुत ठरली

1) हिंदुच्या बहुसंख्याकांची भीती :-

भारतात बहुसंख्य हिंदु असल्याने त्यांच्या नियंत्रणाखाली मुस्लीमांना कायमचे रहावे लागेल मुस्लीम अल्पसंख्य असल्याने राजकीय सत्ता उपभोगता येणार नाही त्यासाठी स्वतंत्र राष्ट्र झाल्यास हिंदु हुकमतेखाली रहावे लागणार नाही असे मुस्लीमांचे मत झाले होते.

2) ब्रिटिशांचे सहकार्य :-

इंग्रज सरकारची फोडा व झोडा ही राजनीती पाकिस्तानच्या निर्मीतीस कारणीभुत ठरली. हिंदु मुस्लीमांमध्ये कायदा तेढ निर्माण झाल्यास आपणास दिर्घकाळ राज्य करता येईल म्हणुन कॉंग्रेसचे आंदोलन सुरु झाल्यावर ब्रिटिशांनी मुस्लीमांना जवळ करुन स्वतंत्र राष्ट्राची मागणी करण्यास सुचविले परिणामी फाळणी घडून आली.

3) जागतिक विचारांचा प्रभाव :-

पहिल्या महायुद्धानंतर हिटलर; मुसोलिनीच्या प्रेरणेने एक धर्म वंश भाषा असलेल्या लोकांना एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरु झाले यातील काही प्रयत्न यशस्वी झाले यापासुन मुस्लीमांना प्रेरणा मिळाली व आणि आपल्या धर्माचे स्वतंत्र राज्य असावे या जाणीवेने त्यांनी प्रयत्न सुरु केले.

Scanned by CamScanner

4) पान इस्लामिझम :-

हिंदुपेक्षा, शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या मुस्लीम खुपच मागासलेले होते. परिणामी, नोकरीमध्ये त्यांना कमी मिळत असे स्वतंत्र मुस्लीम राष्ट्र झाल्यास हिंदुबरोबर तुलनात्मक स्पर्धा असणार नाहीत म्हणुन स्वतंत्र राष्ट्रास पाठिंबा दिला

5) मुस्लीम लीगचा प्रचार :-

मुस्लीम लीगने मुस्लीम बांधवाना स्वधर्म व स्वहिताच्या रक्षणासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. याचा परिणाम मुस्लीमांवर होउन ते स्वतंत्र पाकिस्तानच्या प्रयत्नास लागले.

6) मुस्लीम लीगची आग्रही मागणी :-

सन 1940 च्या लाहोर अधिवेशनात पाकिस्तानचा मागणीचा ठराव पास झाला पाकिस्तानसाठी मुस्लीमांनी वाटेल तो त्याग करण्यास सिद्ध व्हावे असे आवाहन करण्यात आले परिणामी फाळणी अटळ ठरली

• हिंदुस्थानाच्या फाळणीकडे वाटचाल :-

मुस्लीम लीगने लाहोर आधिवेशनापासुन स्वतंत्र राष्ट्रांची भुमिका मांडली आणि त्या दिशेने प्रयत्न चालु ठेवले काँग्रेसने सुरु केलेल्या स्वातंत्र चळवळीपासुन मुस्लीम लीग पुर्णत: अलिप्त राहिली म. गांधीनी सुरु केलेल्या 1942 च्या छोडो भारत आंदोलनाला मुस्लीम लिगने विरोध केला. काँग्रेसच्या नेत्यांचा असा डाव आहे. कि इंग्रजांना भारतातुन मुस्लीमांच्या सहाय्याने हाकलुन दयावयाचे आणि हिंदु राज्य स्थापन करावयाचे मुस्लीमांना भावना भडकवल्या परिणामी हिंदुस्थानाची फाळणीच्या दिशेने वाटचाल सुरु झाली

दरम्यानच्या काळात भारतातील राजकीय प्रेचप्रसंग

Scanned by CamScanner

सोडविण्यासाठी सर स्टॅफर्ड क्रिप्स 23 मार्च 1942 रोजी भारतात आले भारतीय नेत्यांशी वाटाघाटी करुन क्रिप्स योजना जाहिर झाली या योजनेत नमुद करण्यात आले कि घटना समितीने तयार केलेल्या राज्यघटनेनुसार अस्तित्वात येणाऱ्या भारताच्या संघराज्यात जर एखाद्या प्रांताला अथवा काही प्रातांना व संस्थानिकांना सामिल व्हावयाचे नसेल तर त्यांना तशी मुभा दिली जाईल अशा विभक्त राहू इच्छिणाऱ्या प्रांताना आणि संस्थानिकांना आपली स्वतंत्र घटना तयार करण्याचा पूर्ण अधिकार राहिल असा विभक्त राहू इच्छिणाऱ्या प्रातांना व संस्थानिकांना भारताप्रमाणेच वसाहतीच्या दर्जाचे पूर्ण स्वातंत्र किंवा सबंध राष्ट्र शकतील प्रांताना फुटून निघण्याचा अधिकार क्रिप्स योजनेने मान्य केले त्याचा महितार्थ असा की पाकिस्तानच्या निर्मितीची आगाऊ तरतुद क्रिप्स योजनेमध्ये करण्यात आली होती

काँग्रेसने जर पाकिस्तानची मागणी मान्य केली नाही तर त्याचे गंभीर परिणाम भारताला भोगावे लागतील अशी धमकी बॅ जीनांनी दिली म्हणुन भारतातील राजकीय कोंडी फोडून स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करणाऱ्या उद्देशाने मुस्लीम लीगशी तडजोड करण्यासाठी चक्रवर्ती राजगोपालचारी यांनी एक योजना मार्च 1944 मध्ये या योजनेबाबत बॅ जीनांसोबत वाटाघाटी केल्या या योजनेनुसार पाकिस्तनला तत्वत मान्यता देण्यात आली.

- सन 1945 च्या सार्वत्रिक निवडणुका :-

सन 1945 मध्ये दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती झाली त्यापूर्वी इंग्लडमध्येही सार्वत्रिक निवडणुक झाल्या त्यात कॉन्झर्वेटिव्ह पक्ष पराभुत होउन मजुर पक्ष सत्तेवर आला आणि त्यांनी भारताला लवकरात लवकर स्वातंत्र बहाल करण्याचे जाहिर केले भावी राजकीयच व्यवस्थेसाठी भारतात सन 1945 मध्ये सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या केंद्रीय कायदेमंडळात 102 जागांपैकी 57 जागा राष्ट्रीय सभेने तर मुस्लीम लीगने 30 जागांवर विजय मिळवीला प्रांतिय कायदेमंडळात मुस्लीम लीगला बंगाल व सिंधु

Scanned by CamScanner

Page No:
Date. / /

प्रांतात बहुमत मिळवले तर उर्वरित सर्व प्रांतामध्ये कॉंग्रेसला बहुमत मिळवले या निवडणुकीवर हे स्पष्ट झाले कि भारतात कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग हे दोन पक्ष प्रबळ आहेत परिणामी बॅ जीना व मुस्लीम लीग यांच्या सामर्थ्यात व राजकीय महत्वाकांक्षेत कल्पनेपेक्षा जास्त वाढ झाली त्यामुळे पाकिस्तान आता त्यांना नजरेच्या टप्प्यात दिसु लागले.

## ● कॅबिनेट मिशन :- मिशन :-

मार्च १९४६ मध्ये भारताचे सचिव पेथिक लॉरेन्स व्यापारी मंडळाचे अध्यक्ष क्रिप्स व नौदल अधिकारी आलेक्झांडर हे भारताच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी भारतात येऊन त्यांनी आपली योजना जाहिर केली ही योजना त्रिमंत्री योजना म्हणुन ओळखली जाते हि कल्पना अव्यवहारी आहे असे मत त्यांना दिले त्यामुळे मुस्लीम लीगने नाराजी दर्शवली परंतु हंगामी सरकारमध्ये सामील सचारीही दाखवली.

## ● मुस्लीम लीगची प्रत्यक्ष कृती :-

धारा परिषदेच्या निवडणुका मार्च १९४६ मध्ये झाल्या धारा परिषदेत राष्ट्रीय सभेला प्रचंड बहुमत मिळाले त्यामुळे मुस्लीम लीगचे नेते संतप्त झाले ब्रिटीश सरकार आणि राष्ट्रीय सभा व कॉंग्रेस नेते पाकिस्तानिर्मीतीचा प्रस्ताव सहजासहजी मान्य करणार नाहीत हे बॅ जीनानी ओळखले त्यासाठी आता प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आलेली आहे हे लक्षात घेऊन १६ ऑगस्ट १९४६ हा हिंदुच्या कत्तलीचा प्रत्यक्ष कृती दिवस ठरवण्यात आला त्यानुसार मुस्लीम समाजाला शिथावणी दिली त्यानुसार सर्व मुस्लीमांना जिहाद पुकारले आणि हिंदीचे पद्धतशीर शिरकाण सुरु झाले एका कलकत्ता शहरात 5.000 हिंदुची कत्तल करण्यात आली या कत्तलीतुन वृद्ध स्त्री पुरुष स्त्रीचा मुले मुली व लहान अर्भकेही सुटले नाहीत प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम देशभर चालु झाला १९४६

Scanned by CamScanner

अधिकारी या बाबतीत हेतुपुरस्सर तटस्थ राहिले त्यानंतर हिंदूंनीही मुस्लीमांच्या कत्तली सुरु केल्या सर्व देशाच आता हिंदू मुस्लीम यादवी युद्धात लोटण्याचे कार्य प्रत्यक्ष कृतीने केले.

## • लॉर्ड माउंटबॅटन यांची फाळणी योजना :-

3 जून 1947 रोजी लॉर्ड माउंटबॅटन यांनी राष्ट्रीय सभा व मुस्लीम लीग या दोन्ही बाजूच्या नेत्यांशी चर्चा करुन भारत देशाच्या फाळणीची योजना जाहिर केली या योजनेतील तरतुदी पुढीलप्रमाणे

1) हिंदुस्थानाची फाळणी ही एक वस्तुस्थिती आहे.
2) बंगाल आसाम व पंजाब या प्रांताच्या फाळणीसाठी विभाजन केले जाईल.
3) भारत व पाकिस्तान यापैकी कोणत्या देशात सामील व्हायचे यासाठी सरहद्द प्रांतात सार्वमत केले जाईल.
4) इंग्रज 15 ऑगस्ट 1947 रोजी सत्तात्याग करतील
5) त्यानंतर ब्रिटिश राष्ट्रकुलात रहावयाचे की नाही हे ठरवण्याचे अधिकार दोन्ही देशांना राहिला.
6) भारत व पाकिस्तान यांच्या सीमा ठरवण्यासाठी एक सीमा कमिशन नेमण्यात येईल.
7) त्रिमंत्री योजनेप्रमाणे संस्थानिकांची स्थिती राहिल म्हणजेच सत्तांतरानंतर स्वतंत्र होण्याची त्यांना मुभा असेल.

राष्ट्रीय सभेने ही योजना मान्य केली मात्र मुस्लीम लीगने नाराजी व्यक्त करुन या योजनेला मान्यता दिली.

## • भारतीय स्वातंत्र्याचा कायदा :-

18 जुलै 1947 रोजी मांउटबॅटन योजनेवर आधारित भारतीय स्वातंत्र्याचा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केला त्यातील प्रमुख कलमे पुढीलप्रमाणे

1) 15 ऑगस्ट 1947 नंतर इंग्लंडचा हिंदुस्थानाच्या कोणत्याही परदेशावर हक्क राहणार नाही.

Scanned by CamScanner

Page No:
Date. / /

2) 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत व पाकिस्तान अशा दोन राष्ट्रांची निर्मिती होईल व त्याच दिवशी इंग्लंडची हिंदुस्थानावर असलेली सर्व सत्ता भारत व पाकिस्तान सरकारकडे दिली जाईल.

3) दोन्ही राष्ट्रांना स्वतःची घटना तयार करण्याचा संपूर्ण अधिकार असेल

4) ब्रिटीश राष्ट्रकुलात रहायचे की नाही याचा निर्णय उभय राष्ट्रांनी स्वातंत्र्यपणे घ्यावयाचा आहे.

5) इंग्लंडच्या राजाने हिंदुस्थानाचा सम्राट हे पद रद्द करण्यात आले आहे

6) ब्रिटिश सरकारचे संस्थानिकांशी यापूर्वी जे करार झाले आहेत ते सर्व रद्द करण्यात येत आहेत तसेच त्यांनी भारतात कि पाकिस्तानात की स्वतंत्र रहावयाचे हे स्वतः ठरावावे.

7) नवीन विधानसभा अस्तित्वात येईपर्यंत विद्यमान प्रांताच विधानसभा कार्यरत राहतील

अशा रितीने भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्र अस्तित्वात आली 14 ऑगस्ट 1947 रोजी पाकिस्तानाची निर्मिती झाली आणि 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला.

Scanned by CamScanner

Page No.:
Date: / /

## • फाळणीचे परिणाम :-

लॉर्ड रॅडॉल्फ चर्चिल नेहमी म्हणत असे की काच टाटल ते झाले तरी भारतावर आपले राज्य असेलच पाहिजे कारण भारत हे ब्रिटीश साम्राज्याच्या मुकूटामधील एक रत्न आहे याच कारणामे ब्रिटीश राज्यकर्त्यांचा भारताला स्वातंत्र्य देण्यास विरोध होता परंतु भारतीयांच्या स्वातंत्र्यलढ्यापुढे इंग्रजांना नमते घ्यावे लागते इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देताना भारताचे जेवढे वाईट करता येईल तेवढे करण्याचा प्रयत्न केला यातुनच त्यांनी एकसंघ भारताची भारत व पाकिस्तान अशी फाळणी केली या फाळणीचे परिणाम पुढीलप्रमाणे

## 1) निर्वासितांमुळे निर्माण झालेल्या अडचणी :-

फाळणीनंतर सहा महिन्यांच्या काळात सुमारे एक कोटी पंचवीस लक्ष लोकांनी स्थलांतर केले जागतिक इतिहासातील हे सर्वात मोठे स्थलांतर मानले जाते एवढ्या मोठ्या प्रमाणावर निर्वासितांचा प्रश्न निर्माण होईल याची कल्पना नव्हती परिणा मी शांतता व सुव्यवस्था कोलमडून पडली जातीय दंगलींना आवर घालणे अशक्य होऊन गेले यावेळी बहुसंख्य निर्वासीत आपआपला देश सोडून भारताकडे किंवा पाकिस्तानकडे जाताना हजारो स्त्रियांना आणि मुलांना पळवले निर्वासीतांच्या गाड्या थांबवून त्यांना ठार मारण्यात आले असाहाय्य स्त्रियांवर अत्याचार करण्यात आला निर्वासितांच्या मदतीसाठी अनेक छावण्या उभारल्या परंतु फाळणीमुळे शांतता व सुव्यवस्था नावालाही शिल्लक राहिली नाही.

## 2) हिंदु - मुस्लीम जातीय दंगली :-

इंग्रजांनी सत्ताबुध्द पद्धतीने जातीयवाद रुजविला आणि वाढविला परिणामी फाळणी झाली आणि सर्वत्र जातीय दंगे भडकले त्यामुळे सर्व देशात हिंसा स्त्रियांचे अपहरण संपत्तीची लुटालूट इत्यादी घटनांचे प्रमाण वाढले लोक सापडेल ते शस्त्र हातात घेऊन घराबाहेर पडू लागले पंजाबमधील

Scanned by CamScanner

अमृतसर मुलतान येथे सन 1947 मध्ये फाळणी झाल्यानंतर दंगलीला सुरवात झाली 17 ऑगस्ट 1947 रोजी सर रॅडक्लि फ यानेे पंजाब व बंगाल प्रांताचे विभाजन करणे होणार हे जाहिर केले. आणि त्यामुळे जातीय दंगे मोठ्या प्रमाणात वाढले शीख व मुस्लिम यांच्यातील संघर्ष वाढला.

3) निर्वासितांचे पुनर्वसन :-

फाळणीमुळे भारतात आलेल्या निर्वासितांची संख्या अतिशय मोठी होती त्यामुळे त्यांच्या पूर्नवासनाचा प्रश्नही गंभीर होता या प्रश्नांमध्ये निवासाचा खाण्याचा कपड्याचा आणि आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा होता भारत सरकारने अनेक ठिकाणी छावण्या निर्माण केल्या मंदीर मशीदमध्ये निवाय दिला भारतात आलेल्या निर्वासितांपैकी बहुसंख्य निर्वासित हे शेतकरी होते त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने प्रयत्न केला पूर्व पंजाबातुन पाकिस्तानात गेलेल्या मुस्लीमांच्या जमिनी देऊन दीड लाख निर्वासितांचा प्रश्न सोडविला त्यांना गुरे शेतीची उपकरणे बी बियाने पुरविली तसेच त्यांना कर्जही दिल

4) फाळणीमुळे भारताच्या वाट्याला कमी जमिन व आर्थिक लोकसंख्या :-

फाळणीपूर्वी अखंड भारताची जवळी एकुण लोकसंख्या होती त्यातील 81 टक्के लोकसंख्या फाळनीनंतर भारतात राहिली तर अखंड भारताची जवळी एकुण जमिन होती त्यातील 77% जमिन भारताच्या वाट्याला आली फाळणीनंतर अखंड भारताच्या लोकसंख्येपैकी फक्त 19% लोकसंख्या पाकिस्तानात गेली आणि 23% जमिन पाकिस्तानला मिळाली परिणामी भारताला कमी जमिन व अधिक लोकसंख्या प्रश्नाला तोंड द्यावे लागले.

Scanned by CamScanner

Page No.:
Date: / /

5) भारतीय शेतीचे नुकसान :-
फाळणीमुळे कालवे व पाटबंधारे असलेली सुपीक जमिन पाकिस्तानात गेली जी जमिन भारताच्या वाट्याला आली त्यात पाणीपुरवठ्याची फारशी सोय नव्हती फाळणीमुळे भारताला लोकसंख्येपैकी असे शेतीचे नुकसान झाले.

6) फाळणीमुळे अन्नधान्याची टंचाई :-
अखंड भारतातील उत्तम फायदार कालवे व पाटबंधाऱ्याची सोय असलेली सुपिक जमिन फाळणीनंतर पाकिस्तानात गेली परिणामी भारतात अन्नधान्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली त्यामुळे १९५४ व १९५५ साली अंदाजे तीनशे कोटीचे अन्नधान्य परदेशातुन आयात करावे लागले

7) फाळणीमुळे भारतात भाववाढ :-
सुपीक भुभाग पाकिस्तानात गेल्यामुळे आणि अन्नधान्य आयात करावे लागल्यामुळे भारताला अनेक वर्षे भाववाढीचा सामना करावा लागला

8) भारतातील उद्योगधंद्याचे नुकसान :-
फाळणीपूर्वी अखंड भारतात म्हणजे तागाचे जेवढे एकुण उत्पादन होते त्यापैकी 70% तागाचे उत्पादन करणारा प्रदेश पाकिस्तानात गेला आणि तागाच्या आणि कापडाच्या गिरण्या मात्र भारतात राहिल्या त्यामुळे फाळणीनंतर कच्चा माल नसल्यामुळे या गिरण्या बंद पडल्या अनेक कामगारांवर उपासमारीची वेळ आली

9) भारतीय बाजारपेठेत मंदी :-
फाळनीनंतर भारताला अन्नधान्यापासुन ते लहान मोठ्या क्षेत्रापर्यंत अनेक वस्तुची मोठ्या प्रमाणावर परदेशातुन आयात करावी लागली परिणामी भारतातील उद्योग व्यवसाय व व्यापार यातील समतोल बिघड निर्माण झाला.

Scanned by CamScanner